दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : २२०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, शनिवार, दि.२२ मार्च २०२५




## थोडक्यात

### मेट्रोच्या नवीन मार्गिकांवरील स्थानके अत्याधुनिक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, पुणे :** पुणे, पिंपरी-चिंचवड शहरातील मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पांना गती देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू केली आहे. प्रकल्पातील खराडी ते खडकवासला आणि नळ स्टॉप ते माणिकबाग या मेट्रो मार्गावरील स्थानकांसाठी 'रचनाकार सल्लागार समिती'साठी खासगी कंपन्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (महामेट्रो) निविदा मागविण्यास सुरुवात केली आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील पहिल्या टप्प्यातील मार्गांचा विस्तार अंतिम टप्प्यात असताना दुसऱ्या टप्प्यातील पाच मार्ग नव्याने प्रस्तावित करण्यात आले आहेत. त्यापैकी खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी या २५.५१ किलोमीटर अंतराच्या मार्गावर २२ स्थानके आहेत, तर नळ स्टॉप ते वारजे-माणिकबाग ६.१२ किलोमीटर मार्गावर सहा स्थानके निश्चित करण्यात आली आहेत. या दोन्ही मार्गावरील स्थानकांची रचना भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून आणि इतर दळणवळण यंत्रणा परिस्थितीनुरूप सुनिश्चित करण्यासाठी 'मेट्रो'ने खासगी रचनाकार सल्लागार समितीची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविल्या आहेत.

### हिंजवडीत धावत्या बसला आग चार जणांचा होरपळून मृत्यू



**दि.२१, पुणे :** पिंपरी- चिंचवड मध्ये बसला आग लागल्याने चार जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. सहा जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. होमा प्रिंटिंग प्रेस ची बस तमन्ना सर्कल वरून रेजवान च्या दिशेने जात होती. अचानक बसला समोरून आग लागल्याने चालकाने उडी घेतली. ही घटना सकाळी आठच्या सुमारास घडली आहे. बस मध्ये एकूण १५ जण होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी- चिंचवडच्या हिंजवडी मध्ये होमा प्रिंटिंग प्रेस कंपनीच्या बसला आग लागली. तमन्ना सर्कल वरून रिजवान च्या दिशेने जाणाऱ्या बस ने समोरून अचानक पेट घेतला. चालकाला देखील आगीच्या झळा पोहोचल्याने आणि त्याच्या पायाला आग लागल्याने त्याने उडी घेतली. धावत्या बसचा वेग कमी झाला. पुढे काही अंतरावर जाऊन ती सिमेंट च्या ब्लॉकला धडकली. तोपर्यंत बसमधील इतर व्यक्तींनी खिडक्यातून उड्या मारल्या परंतु, पाठीमागे असलेल्या चार जणांना बाहेर पडता आलं नाही. आपत्कालीन दरवाजा उघडला गेला नाही. यात चारही जणांचा होरपळून जागीच मृत्यू झाला आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. सहा जणांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# औरंगजेबाचं नाव घेऊन मुख्यमंत्र्यांवर टीका केली कारण...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, बुलडाणा :** काही दिवसांपूर्वीच काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारवर टीका केली होती. देवेंद्र फडणवीस यांचा कारभार औरंगजेबाप्रमाणेच आहे असंही सपकाळ म्हणाले होते. आता पुन्हा एकदा त्यांनी तसंच विधान केलं आहे.

**काय म्हणाले हर्षवर्धन सपकाळ?**

महाराष्ट्रातली सध्याच्या घडीची सगळ्यात मोठी समस्या कुठली असेल तर ती म्हणजे माणसा-माणसांत, समाजात, माणसांच्या मनामनांत, जाती-धर्मात जो द्वेष पसरतो आहे. या गोष्टी घडत असल्याने सद्भावना हा विचारच लयाला गेला आहे. दुसरीकडे माणसं कुठल्याही दुकानात गेली असताना किंवा कुठला व्यवहार करत असताना जातीच्या व्यक्ती आहेत का? हे पाहू लागली आहेत. एवढंच नाही तर कुठल्या कार्यक्रमाला पाहुणा म्हणून बोलवलं जात असताना आपल्याच जातीचा व्यक्ती असावा यासाठी आग्रही आहेत असं दिसून येतं आहे. तात्पर्य म्हणून सांगायचं झालं तर शिव, फुले शाहू आंबेडकरांचा वारकऱ्यांचा संत गाडगेबाबांच्या विचारांचा आणि महाराष्ट्र धर्म जो आपण मानतो त्याची घडी कुठेतरी विस्कळीत झाल्याचं दिसून येतं आहे असं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे.

**सद्भावना जपणं आवश्यक आहे : सपकाळ**

समाजाची ही अशी घडी विस्कटलेली असताना कुठल्या मुद्द्यावर काम केलं पाहिजे तर त्याचं उत्तर हे सद्भावना हे आहे. असंही सपकाळ म्हणाले, सपकाळ यांनी राज्याच्या एकंदरीत परिस्थितीवर भाष्य केलं आहे. एबीपी माझाच्या माझा महाराष्ट्र माझं व्हिजन या कार्यक्रमात मुलाखत देत असताना हर्षवर्धन सपकाळ यांनी विविध मुद्द्यांवर त्यांनी त्यांचं मत प्रदर्शन केलं आहे.

**मी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर टीका केली कारण...**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा



कारभार औरंगजेबासारखाच आहे असं मी म्हटलं याचं कारण ते करत असलेला कारभारच आहे असं सपकाळ म्हणाले, तसंच ते पुढे म्हणाले, आगामी काळात सद्भावना बाळगूनच समाजासाठी काम करण्याची माझी पक्षीय आणि व्यक्तिगत इच्छा आहे. औरंगजेबाचा दाखला देत मी मुख्यमंत्र्यांवर टीका केलेली नसून ते वक्तव्य कारभाराच्या अनुषंगाने होतं. ज्या घटना सध्या राज्यात घडत आहेत त्यामागचं वास्तव अत्यंत क्रूरपणे एकापाठोपाठ एक उजेडात येत आहे. हा घटनाक्रम लक्षात घेता मी ते वक्तव्य केलं असं स्पष्टीकरण सपकाळ यांनी दिलं आहे.

**तरुण शेतकरी आत्महत्या करतो हे दुर्दैवी आहे : सपकाळ**

राज्यपालांनी पुरस्कार दिलेल्या तरुण शेतकऱ्यावर आठ पाणी पत्र लिहून आत्महत्येची वेळ आली, बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या घरी मी जाऊन आलो आहे. संतोष देशमुख यांची ज्या क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली त्याचे वर्णनही आपण करू शकत नाही. तिथे पोलिस ही नाही, हम करे सो कायदा असं म्हणत निवडक टोळीच्या हातात कायदा आहे. पुण्यातील स्वारगेट बस स्थानकावरील बलात्काराची घटना असेल. जळगाव मध्ये एका केंद्रीय मंत्र्याला पोलीस स्टेशनमध्ये धरणे आंदोलन देऊन आरोपींना अटक करा अशी मागणी करावी लागते आहे. बुलढाणा जिल्ह्यातील कैलास नागरे नावाचा शेतकरी तरुण आहे. शेतीतील अभिनव प्रयोग या विषयात त्याला स्वतः राज्यपालांनी पुरस्कार देऊन सन्मान केला आहे. त्या शेतकऱ्याच्या अंत्यविधीला मी गेलो होतो. माझ्या मुलाला तू शिकव असं काही म हिन्यापूर्वी मी त्याला म्हणालो होतो. त्याच तरुण शेतकऱ्याने आठ पानी पत्र लिहून आत्महत्या करावी लागते हे उघड उघड शासनाचे अपयश आहे. असंही मत सपकाळ यांनी व्यक्त केलं आहे.

# ॲथलेटिक्समध्ये महाराष्ट्राला ३ सुवर्ण, रिक्षा डायव्हरच्या मुलाची सुवर्ण कामगिरी

## चैतन्य, साहिल, सिध्दीची सुवर्णमय कामगिरी, मीनाक्षीला रौप्य

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, नवी दिल्ली :** अपेक्षेप्रमाणे महाराष्ट्राच्या पॅरा खेळाडूंनी ३ सुवर्णांसह १ रौप्य पदक जिंकून खेलो इंडिया पॅरा स्पर्धेतील ॲथलेटिक्सचे मैदान गाजवले.१०० मीटर शर्यतीत अकोलाच्या चैतन्य पाठकसह गोळाफेकीत कराडच्या साहिल सय्यद, पुण्याच्या सिध्दी क्षीरसागरने सुवर्ण यशाला गवसणी घातली.चैतन्य हा रिक्षा डायव्हरचा मुलगा असून बारावीच्या परिक्षेला दांडी मारून त्याने खेलो इंडिया स्पर्धेची पात्रता फेरीतही यश संपादन केले होते. जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये सुरू असलेल्या दुसर्‍या पर्वातील खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत जय महाराष्ट्राचा सूर निनादला. अकोला शहरातील रिक्षा चालकाचा मुलगा असणार्‍या चैतन्य विजय पाठकने १०० मीटर धावणे टी १३ प्रकारात सुवर्ण धाव घेतली. ११.५९ सेकंदात शर्यत पुर्ण करीत चैतन्यने पदार्पणातच सुवर्णपदकाचा करिश्मा घडविला. ३५ टक्के डोळ्याने अधू असलेल्या चैतन्यने महिन्याभरापूर्वीच राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण यश संपादून खेलो इंडिया स्पर्धेची पात्रता फेरी गाठली होती. या स्पर्धेमुळे बारावीच्या समाजशास्त्रच्या पेपरला दांडी मारून त्याने सुवर्ण यशाला गवसणी घातली होती. चैतन्यचे वडिल





विजय पाठक हे अकोल्यात प्रवाशी रिक्षा चालवितात तर आई स्वच्छता कर्मचारी आहे. मातीवर सराव करणार्‍या चैतन्यने करून ट्रॅकवर आपली हुकुमत सिध्द केली. अकोल्यात रवि भटकर यांच्या मार्गदर्शनाद्वारे तो कसून सराव करीत असतो. क्रिकेटपटू ते गोळाफेकपटू असा प्रवास करणार्‍या कराडच्या साहिल सय्यदने एफ ६४ गोळाफेकीत सुवर्णपदकाचा पल्ला पार केला. वैयक्तिक चौथ्या फेरीत ९.५७ मीटरची सर्वात्तम फेकी करून कराडच्या साईलने सोनेरी यशाचे शिखर गाठले.२६ वर्षीय साईल व्हिलचेअर क्रिकेटमध्ये अनेकवर्ष रमला होता.दोन वर्षापासून त्याने गोळाफेक व थाळीफेक स्पर्धेकडे लक्ष दिले.पुण्यातील सणस मैदानात प्रशिक्षिका सोनिया शिंदे यांच्या मार्गदर्शनाव्दारे वर्षभरातच त्याने राष्ट्रीय स्पर्धेत पदकाची जादू घडविला. पाठोपाठ आता पदार्पणातच खेलो इंडिया स्पर्धेतही सुवर्ण यश संपादन केले.

**गोळाफेकमध्ये महाराष्ट्राची सुवर्ण 'सिद्धी'**

ॲथलेटिक्समधील महिलांच्या गोळाफेक एफ ५६ प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सुवर्णसह रौप्यपदक पटकावले. पुण्याची सिद्धी क्षीरसागर सुवर्णपदकाची मानकरी ठरली. हजारो प्रेक्षकांच्या साक्षीने पुण्याच्या २० वर्षीय सिद्धीने अंतिम फेरीत ५.८८ मीटर गोळाफेक करीत अव्वल स्थान पटकावले. ५.६३ मीटर गोळा फेकणारी महाराष्ट्राचीच मीनाक्षी जाधव रौप्यपदकाची मानकरी ठरली. तमिळनाडूच्या लिझी वेलू हिने (४.९५ मीटर) कांस्यपदक मिळवले.

२०१६ मध्ये विषाणूजन्य आजारामुळे पाठीखालील भाग अधू झाल्यावरही हार न मानता सिद्धीने वडील विकास क्षीरसागर यांच्या पाठिंब्याच्या जोरावर आयुष्याशी दोन हात करण्याची जिगर दाखवली. यंदा फेब्रुवारीमध्ये झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत तिने कांस्यपदक मिळवले. या आधारावर तिने वर्ल्ड चॅम्पियनशिपसाठी पात्रता मिळवली. सुवर्णपदक जिंकल्याचा आनंद आहे. माझ्या या यशात प्रशिक्षक सोनिया शिंदे यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. यंदा नवी दिल्लीत सप्टेंबर - ऑक्टोबरमध्ये होणार्‍या वर्ल्ड चॅम्पियनशिप मध्ये मला देशासाठी पदक जिंकायचे आहे, अशी प्रतिक्रिया सिद्धीने व्यक्त केली.

वयाच्या २१व्या वर्षी सूरपारंब्या खेळताना झाडावरून पडल्याचे निमित्त होऊन मीनाक्षीच्या पाठीच्या कण्याचे कायमचे नुकसान झाले. मात्र याचे दुःख मागे ठेऊन तिने खेळात स्वतःला झोकून दिले. तिने बास्केटबॉल आणि हँडबॉलमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व केले. बालपणापासून मला ॲथलेटिक्सची आवड होती. मात्र परिस्थितीमुळे संधी मिळाली नाही. त्यामुळे गोळाफेकमध्ये मिळालेले हे रौप्यपदक माझ्यासाठी खास आहे, अशी प्रतिक्रिया मूळची फलटणची पण आता वाशीत स्थायिक असलेल्या ३४ वर्षीय मीनाक्षीने व्यक्त केली. या वाटचालीत वाशी येथील कमला रहेजा (शरण) पॅराप्लेजिक सेंटरचे सर्वतोपरी सहकार्य लाभल्याचे मीनाक्षीने आवर्जून सांगितले.

# मंगळवेढा तालुका वन विभागातील भ्रष्टाचाराची आ.आवताडेनी केली पोलखोल

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२१, पंढरपूर :** मंगळवेढा तालुक्यातील डोनज येथील दहा हेक्टर वन क्षेत्रावर ११००० झाडे लावण्याचे उद्दिष्ट तयार करून त्याचे अंदाजपत्रक ही तयार केले त्या झाडांना पाणी देण्यासाठी टेंडर एकाच्या नावे करून प्रत्यक्ष पाणी वाटप ९०० रुपये प्रति टँकर याप्रमाणे दुसऱ्याला दिले प्रत्यक्षात लागवड दोन ते अडीच हजार झाडेच लावली पाणी फक्त वृक्ष लागवड करतानाच घातले त्यानंतर तीन वर्षे काही झाडे पावसाच्या पाण्यावर जगली यासंदर्भात डोनज गावच्या सरपंचाने या भ्रष्टाचाराच्या विरोधात तक्रार करण्यासाठी माहिती मागितली असता वनक्षेत्रपाल यांनी तक्रार केल्यास तुमच्यावर शासकीय कामात अडथळा केल्याचा गुन्हा दाखल करीन असा दम दिला त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करून चौकशी करणार का? असा प्रश्न आमदार समाधान आवताडे यांनी सुरू असलेल्या अधिवेशनादरम्यान उपस्थित करून मंगळवेढ्यातील वनविभागाच्या भ्रष्टाचाराला वाचा फोडली.

सध्या सुरू असलेल्या अधिवेशनामध्ये आमदार समाधान आवताडे यांनी डोनज येथे वन विभागाने केलेल्या भ्रष्टाचाराचा पाढाच वाचला यामध्ये वनविभागाने गवत रोपण,सीसीटी, टीसीएम,चेक डॅम, मातीनाला अशी कामे कागदावरच दाखवून



बिले काढल्याचा प्रकार केला आहे वनविभागाने तालुक्यात शासकीय रोपवाटिका ही तयार केली नाही. ११००० वृक्ष लागवड कागदावरच दाखवून सध्या प्रत्यक्षात हजार वृक्ष ही जिवंत नाहीत याबाबत त्या ग्रामपंचायत ने तक्रार केल्यानंतर त्यांनाच धमकावण्यात आले पानवठे न केल्यामुळे आणि त्यामध्ये पाणी न ठेवल्यामुळे वनपरिक्षेत्रातील प्राणी मनुष्य वस्तीमध्ये पाण्याच्या शोधात येत आहेत व शेतकऱ्यांच्या पिकांची नासधूस करत आहेत तसेच शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यांना भक्ष बनवत आहेत, तरी कागदावर बिले काढून भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करणार का? असा प्रश्न आमदार समाधान आवताडे यांनी उपस्थित केला असता तुमच्याकडे असलेले सर्व पुरावे द्या मी कारवाई करतो असे उत्तर संबंधित वनमंत्री गणेश नाईक या मंत्र्यांकडून आमदार समाधान आवताडे यांच्या प्रश्नावर देण्यात आले.

अक्षराज
२ बुलडाणा, शनिवार, दि.२२ मार्च २०२५ विविधा

# संपादकीय



## कर्नाटकात हनी ट्रॅप तापले

कर्नाटकमध्ये सध्या हनी ट्रॅपचा मुद्दा चांगलाच तापला आहे. सहकार मंत्री के.एन.राजन्ना यांनी विधानसभेत बोलताना केलेल्या एका दाव्यानंतर राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. एका केंद्रीय नेत्यासह ४८ नेते हनी ट्रॅपमध्ये अडकल्याचा दावा मंत्री के.एन.राजन्ना यांनी केला. त्यांच्या या दाव्यानंतर आज कर्नाटकच्या विधानसभेत विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना चांगलंच घेरलं.

यातच आज कर्नाटक सरकारने सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देणारं विधेयक मंजूर केलं. त्यामुळे हनी ट्रॅपचा मुद्दा आणि सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देणारं विधेयकाच्या विरोधात भारतीय जनता पक्षाच्या आमदारांनी विधानसभेत मोठा गदारोळ केला. सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. एवढंच नाही तर काही आमदारांनी विधानसभा अध्यक्षांच्या खुर्चीवर काही कागदपत्रे भिरकावली. त्यामुळे सभागृहात गोंधळ घातल्याप्रकरणी आता भाजपाच्या १८ आमदारांवर निलंबन कारवाई करण्यात आली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. भारतीय जनता पक्षाच्या १८ आमदारांचं ६ महिन्यांसाठी निलंबन करण्यात आलं आहे. दरम्यान, हनी ट्रॅप प्रकरणाची उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींमार्फत चौकशी करण्याची मागणी भाजपाच्या आमदारांनी केली होती. तसेच या कथित हनी ट्रॅप प्रकरणावरून शुक्रवारी विरोधी भाजपाच्या आमदारांनी सभागृहात कागदपत्रे फाडून गोंधळ घातला होता. त्यामुळे या कारणावरून कर्नाटक विधानसभेच्या अध्यक्षांनी भाजपाच्या १८ आमदारांना सहा महिन्यांसाठी निलंबित केलं आहे.

दरम्यान, या १८ आमदारांनी विधानसभेच्या कामकाजात अडथळा आणल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच विधानसभेच्या अध्यक्षांच्या आदेशाचं उल्लंघन केल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती सांगण्यात येत आहे. तसेच निलंबित आमदारांपैकी काही आमदारांनी विधानसभा अध्यक्षांच्या खुर्चीपर्यंत जाऊन कागदपत्रे भिरकावल्याचा आरोप आता सत्ताधारी आमदारांनी केला. यानंतर अखेर आज भाजपाच्या १८ आमदारांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

**निलंबित आमदारांमध्ये कोणाचा समावेश?**

निलंबित करण्यात आलेल्या आमदारांमध्ये विरोधी पक्षाचे मुख्य सचेतक दोड्डानागौडा एच पाटील, अश्वथ नारायण सीएन, एसआर विश्वनाथ, बीए बसवराज, एम आर पाटील, चन्नाबासप्पा (चन्नी), बी सुरेश गौडा, उमनाथ ए कोट्यान, शरणु सालगर, शैलेंद्र बेलदाले, सीके राममूर्ती, यशपाल ए सुवर्णा, बीपी हरीश, भरत शेट्टी वाय, मुनीरत्ना, बसवराज मट्टीमूद, धीरज मुनीराजू आणि चंद्रू लमाणी यांचा समावेश आहे.

## नागपूर ची दगडफेक

निषेध करावा तेवढा थोडा
नागपूरातली दगडफेक
कोणाचेही समर्थन नाही
पसरवू नका बातम्या फेक

घरं गाड्या पेटवून कोणाच्या
घरच्या चुली पेटणार नाही
कोण राष्ट्रभक्त कोण परका
हे ही ठरवता येणार नाही

पोलिस तपास होईल तेव्हा
गुन्हेगारास होणार अटक
बायका पोरांचे होई आबाळ
तू कोर्टकचेरीतच भटक

धार्मिक भावना भडकावून
कोणास काही मिळाले काय
नेत्यांचे चिथावणीखोर भाषणे
आपलीच इथे जळते माय

सारा समाज एकोप्याने राहतो
कुठे हिंसा अबोला नाही कोणात
सारे सण साजरे वस्त्या वस्त्यात
भाईचारा दाटतो मना मनात

**- अशोक बी.कांबळे**
**नागपूर**

# जागतिक जल दिन !!

**आज २२ मार्च, आजचा दिवस जागतिक जल दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज आहे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जगू शकत नाही. पाण्याची गरज नाही असे कोणतेच क्षेत्र नाही. पण आज जगभर पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. पूर्वी मुबलक स्वरूपात उपलब्ध असणाऱ्या पाण्याची आज मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवत आहे.**

पाण्याचे महत्व अनन्य साधारण आहे. पाणी बचत ही काळाची गरज बनली आहे. यामुळेच पाण्याच्या बचतीसाठी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने १९९२ मध्ये झालेल्या अधिवेशनात २२ मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर २२ मार्च १९९३ रोजी पहिल्यांदा जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. ब्राझीलची राजधानी रियो डी जिनोरियो येथे पहिला जल दिन साजरा करण्यात आला. पाणी बचतीसाठी जगभरात जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.

२२ मार्च हाच दिवस जागतिक जल दिन म्हणून निवडण्यामागे कारणही तसेच आहे. २२ मार्च पासून वातावरण बदलास सुरवात होते. त्यामुळे तात्विक दृष्ट्या पावसाळ्याची सुरवात होण्यासाठी हा दिवस कारणीभूत ठरतो. हा तर्क वापरुन हा दिवस निवडण्यात आला आहे. पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण ७१ टक्के इतके असले तरी पिण्यायोग्य पाणी अल्प प्रमाणात आहे. वाढत्या लोकसंख्येची तहान भागवण्यास हे पाणी कमी पडत आहे. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज असली तरी इतर सजीव पाण्याच्या अपव्यय करित नाहीत मानव मात्र पाण्याचा मोठा अपव्यय करतो, गरजेपेक्षा जास्त पाणी वापरतो. पाणी वापराचे नवनवीन मार्ग मानव शोधीत असतो त्यामुळे पाण्याची तीव्रता जाणवते. हवामान बदलामुळे पावसाच्या पद्धतीत झपाटयाने बदल होत आहे. पूर्वी नियमित येणारा पाऊस आता बेभरवशाचा झाला आहे. पावसाचे दिवस आणि पावसाचे प्रमाणही कमी होत चालले आहे. त्यामुळे दुष्काळाचे प्रमाणही वाढले आहे. जागोजागी



बोअरवेल घेऊन जमीनीखालील पाणीही मानवाने संपवले आहे त्यामुळे भविष्यात पाणी टंचाईची समस्या आणखी गंभीर होणार आहे. त्यामुळेच कदाचित पाण्यासाठी तिसरे महायुद्ध होईल असा अहवाल काही दिवसांपूर्वी संयुक्त राष्ट्र संघाने दिला आहे. २०२५ पर्यंत जगातील एक तृतीयांश देशात पाणी पेटणार असल्याचे संकेत शास्त्रज्ञांनी दिले आहेत. आशिया खंडाबाबत सांगायचे झाले तर भारतात पाणी टंचाई मोठ्या प्रमाणात आहे. भारतात मार्चच्या सुरवातीलाच पाणी टंचाईच्या झळा जाणवू लागतात. दरवर्षी ४० टक्के गावांत दुष्काळ असतो. महाराष्ट्रातील मराठवाडा सारख्या विभागात तर दरवर्षी दुष्काळ असतो. लातूर सारख्या शहराला रेल्वेने पाणी पुरवठा करावा लागतो. ग्रामीण भागात तर भीषण पाणी टंचाई जाणवते. अनेक गावांत टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. एकदा आलेला टँकर आठ दिवसांनीच पुन्हा येतो. काही गावात तर एका महिन्यात एकदाच पाणी मिळते. हंडाभर पाण्यासाठी महिलांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागते. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. कृत्रिम पाणी तयार करण्यात अजूनही शास्त्रज्ञांना यश आले नाही म्हणूनच आहे त्या पाण्याची बचत करणे हेच आपल्या हातात आहे. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करूनच आपण पाणी टंचाईवर मात करू शकतो. जल है तो कल है... या उक्तीनुसार येणारा काळ सुखकर करायचा असेल तर पाण्याची बचत करावीच लागेल. आजच्या दिवशी प्रत्येकाने पाणी बचतीचा संकल्प करून पाणी बचतीसाठी प्रयत्न केला तरच जागतिक जल दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## हाय सेक्युरिटी नंबर प्लेट बसवणायसाठी मुदत वाढ

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.२१, लातुर :** पानगाव महाराष्ट्र शासनाने २०१९ पूर्वी च्या सर्व वाहनाच्या नंबर प्लेट च्या सुरक्षेच्या कारणस्तव नंबर प्लेट बदलण्याचा निर्णय घेतला आहे. नंबर प्लेट बसवण्यासाठी शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी केलेल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (HSRP) पाटी बसविण्याचा निर्णय घेतला आहे. सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) बसविण्यासाठी ३१ मार्च २०२५ पर्यंत वाहनमालकांना मुदत देण्यात आली होती. आजपर्यंत जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) बसविण्याचे काम कमी झाले असल्याने उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) बसविण्यासाठी ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. ही मुदत वाढवल्यामुळे वाहन धारक समाधान व्यक्त करत आहेत.

## सुनिता विल्यम्स..

केंव्हापासून अवनी
सुसज्जतव स्वागता
शानदारमहोत्सवात
अवतरली गं सुनिता

निर्धार कसाअसावा
धडा दिलास जगता
महत्व मनु आयुष्यां
कसे उत्साहे जगता

नवनवीन शोध बोध
मार्गदर्शनअभ्यागता
अंतराळे साधे दोस्ती
महानपर्वाची सांगता

मातकशी संकटावर
लिहली सार्थ संहिता
सोसला असह्य त्रास
हसत जगत्जनहिता

तू भारतीय वंशाची
विश्वे शोभली दुहिता
सन्मान नारीजातीचा
कणखर अशीवनिता

विखुरे कर्तृत्व चांदणे
धीर दिलास अबर्गता
शास्त्रांस उसळे उर्जा
नव चैतन्य अस्तंगता

यशस्वीकेली मोहिम
दावेसंशोधन ईशिता
जाणलेअसेल ममत्व
धरतीमातेस स्पर्शिता

**- हेमंत मुसरीफ, पुणे**

# औरंगजेबाची कबर पाडावी कि जपावी ?



पाच पातशाह्यांना नेस्तनाबूत करून छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. हिंदवी स्वराज्याची पताका डौलत ठेवण्याची आणि स्वराज्याचे सर्वार्थाने रक्षण करण्याचे महत्कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनंतर छत्रपती संभाजी महाराजांनी केले. म्हणूनच त्यांच्या नावापुढे 'स्वराज्यरक्षक' ही उपाधी लावली जाते. मध्यंतरी 'स्वराज्यरक्षक संभाजी महाराज' या मालिकेतून छत्रपती संभाजी महाराजांचा भीमपराक्रम जनतेसमोर आणला गेला; मात्र पुढे या मालिकेनेही इतिहासाची मोडतोड केल्याचा आरोप निमत्यांवर करण्यात आला.

संभाजी महाराजांविषयी इतिहासकारांनी लिहिलेल्या उलट सुलट बाबींमुळे महाराजांविषयीचा खरा इतिहास सर्वसामान्य लोकांपर्यंत कधी पोहोचलाच नाही. महाराजांच्या सडेतोड वृत्तीमुळे म्हणा किंवा कर्म-धर्म संयोगाने म्हणा, महाराजांचे अहित पाहणारे लोक दुर्दैवाने स्वराज्यातच निर्माण झाले होते. या सर्वांना छत्रपती संभाजी महाराज मात्र पुरून उरले. ज्या महाभागांनी स्वराज्याचे खाऊन स्वराज्याशी बेईमानी केली त्यांच्याच पुढच्या पिढीच्या काही लोकांनी इतिहासकार बनून संभाजी महाराजांविषयी खोटेनाटे लिहून महाराजांना बदनाम करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. परिणामी एका असामान्य योध्याचा महत्पराक्रम अनेक पिढ्यांपासून झाकोळला गेला. ज्यामुळे आजपर्यंतच्या शालेय अभ्यासक्रमातही संभाजी महाराजांचा इतिहास थोडक्यातच आटोपण्यात आला आहे. छत्रपती महाराजांची युद्धकुशलता आणि अफाट शौर्य पाहता हा योद्धा मुघलांच्या हाती लागणे कदापि शक्य नव्हते; मात्र गद्दारीची कीड लागलेल्या या महाराष्ट्रात एका गद्दारानेच महाराजांना मुघलांच्या हाती पकडून दिले. त्यानंतर औरंगजेबाने ४० दिवस नानाविध यातना देत संभाजी महाराजांची अत्यंत क्रूरपणे हत्या केली हे स्पष्ट असतानाही मध्यंतरीच्या काळात ब्राह्मणद्वेषाची कावीळ झालेल्या काही आधुनिक इतिहासकारांनी संभाजी महाराजांची हत्या ब्राह्मणांनी केली आणि त्यांचे मुंडके भाल्यात रोवून मिरवले त्याप्रीत्यर्थ गुढीपाडवा हा सण साजरा केला जात असल्याचा स्वयंघोषी इतिहास मांडला. गेल्या मासात प्रदर्शित झालेल्या 'छावा' या हिंदी चित्रपटाने छत्रपती संभाजी महाराजांचा खरा इतिहास जगासमोर आणला. त्यांचा अतूट पराक्रम जनतेसमोर आणताना क्रूरकर्मा औरंग्याने महाराजांचे कशा प्रकारे हाल केले, त्यांना कशा यातना दिल्या आणि त्यांची कशी निर्घृणपणे हत्या केली हेही सर्वांसमोर आणले. या चित्रपटाने चित्रपट जगतात नवा इतिहास रचला. घरातील लहानांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांनीच हा चित्रपट पाहिला. चित्रपटगृहाच्या बाहेर पडणाऱ्या प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू होते आणि मनात औरंग्याविषयी पराकोटीचा द्वेष होता. या द्वेषाने पुढे उसळी घेतली आणि संभाजीनगरात असलेली औरंगजेबाची कबर उखडून टाकण्याची मागणी एकमुखाने होऊ लागली. ही मागणी सर्वसामान्य जनतेची होती. यामागे कोणतेही राजकारण नव्हते, होती ती केवळ सुडाची भावना आणि चित्रपट पाहून उमटलेली स्वाभाविक प्रतिक्रिया. ज्या क्रूरकर्माने आमच्या महाराजांची निर्दयीपणे हत्या केली त्याचे या महाराष्ट्रभूमीत उदात्तीकरण का केले जात आहे हा संतप्त सवाल प्रत्येकाच्या अंतर्मनात होता.

महाराष्ट्रभूमी छत्रपती शिवरायांच्या आणि मावळ्यांच्या पराक्रमाने पावन झालेली भूमी आहे. या महाराष्ट्रावर वक्रदृष्टीने पाहणाऱ्या, या भूमीवर हल्ले करून तिला लुटू पाहणाऱ्या प्रत्येक लुटारूंचे मनसुबे या भूमीतील पराक्रमी वीरांनी उधळून लावले आहेत आणि त्यांच्या कबरी या महाराष्ट्राच्या भूमीतच खणल्या गेल्या आहेत हे दर्शवण्याचे काम येथील लुटारुंच्या कबरी करत आहेत. आपल्या एका पिढीने दाखवलेल्या अतुलनीय पराक्रमाचे दर्शन पुढच्या पिढीला होण्यासाठी या कबरी शाबूत असायला हव्यात अशी भूमिका काही जाणकार मांडत आहेत. त्यामुळे त्या उखडून टाकण्याऐवजी त्यांचे उदात्तीकरण थांबवावे असे त्यांचे मत आहे. दुसरीकडे स्वराज्यासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या आणि छत्रपती शिवरायांच्या आज्ञेखातर पराक्रमाची शिकस्त करणाऱ्या अनेक रणधुरंधर मावळ्यांची स्मारके आज धूळ खात आहेत.

अनेकांवर साधे पत्र्याचे छतही नाही, अनेक ठिकाणी नियमित दिवा बत्तीही केली जात नाही, अनेक स्मारकांच्या आजूबाजूला रान वाढलेले आहे, स्मारकापर्यंत जाण्यासाठी पायवाटा केलेल्या नाहीत, दुसरीकडे महाराष्ट्राला लुटायला आलेल्या, हिंदूंची बलस्थाने असलेली पुरातन मंदिरे उध्वस्त करणाऱ्या, देवीदेवतांच्या मुर्त्या फोडणाऱ्या, येथील बायाबापड्यांच्या अब्रूवर घाला घालून त्यांना जनानखान्यात डांबणाऱ्या, तलवारीच्या बळावर हिंदूंचे धर्मांतर करणाऱ्या लुटारुंच्या कबरी मात्र दिवसागणिक अधिकाधिक समृद्ध होत आहेत, काही एकर जमिनींवर त्या पसरल्या आहेत, एखादा शाही राजवाडा वाटावा अशा प्रकारचे सुशोभीकरण त्या ठिकाणी केले गेले आहे, भोवताली अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहेत, या लुटारूंना संतांच्या उपमा देऊन त्यांचे उरूस काढले जात आहेत, त्यांच्या कबरीवर चादर चढवण्यासाठी रांगा लागत आहेत, तिथे जाऊन लोक नवस करत आहेत, एका समाजाला खुश करण्यासाठी अनेक राजकारणी जाऊन तिथे माथा टेकत आहेत.

शिवप्रभूंच्या महाराष्ट्रात हा पराकोटीचा दुजाभाव तळपायाची आग मस्तकात नेणारा आहे. त्यामुळे या लुटारूंचे उदात्तीकरण तत्परतेने थांबवून राज्यातील मावळ्यांची स्मारके दुरुस्त करावीत आणि त्याठिकाणी नियमित दिवाबत्तीची सोय करावी, मावळ्यांच्या पराक्रमाचा इतिहास ठळक अक्षरांत त्या ठिकाणी मांडावा, आजूबाजूचा परिसर सुशोभित करावा अशी मागणी काही इतिहासप्रेमी करत आहेत. प्रतापगडाच्या पायथ्याशी बांधण्यात आलेल्या अफजलखानाच्या थडग्याशेजारी गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम करण्यात आले होते.

इतिहासप्रेमी आणि हिंदुत्ववादी संघटना यांच्या नियमित पाठपुराव्यामुळे सध्याच्या सरकारला ते अनधिकृत बांधकाम पाडावे लागले. औरंगजेबाच्या कबरीबाबतही सध्या तिच परिस्थिती असून त्याठिकाणीही मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम उभे राहिले आहे त्यामुळे औरंगजेबाची कबर तशीच ठेवून आजुबाजुचे अनधिकृत बांधकाम पाडावे, संरक्षित स्मारकांच्या यादीतून औरंगजेबाच्या कबरीचे नाव काढावे आणि औरंगजेबाचे होत असलेले उदात्तीकरण थांबवावे अशी मागणी आज हिंदुत्ववादी संघटना करत आहेत. याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला असून पुढील काही काळात जे अफझलखानाच्या कबरीबाबत करण्यात आले तेच औरंगजेबाच्या कबरीबाबतही करावे अशी इतिहासप्रेमी आणि हिंदुत्ववाद्यांची अपेक्षा आहे !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## टाकळीढोकेश्वर परिसरात विस्तारीत एमआयडीसीची गरज - आमदार दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर मतदारसंघामध्ये सुपा एमआयडीसी अतिशय चांगल्या पद्धतीने उभी आहे. मोठे उद्योग तेथे आले आहे. परंतु स्थानिक नागरीकांना हक्काच्या एमआयडीसीत डावलले जात आहे. सुपा एमआयडीसीत शासनाचे स्थानिकांना रोजगार मिळण्याचे धोरण पाळले जात नाही. त्यामुळे स्थानिकांना हक्काचा रोजगार मिळण्यासाठी शासनाने योग्य पाऊले उचलावीत. पारनेर तालुक्यातील युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होण्यासाठी सरकारने भाळवणी टाकळी ढोकेश्वर परिसरात विस्तारीत एमआयडीसी देण्याची मागणी आमदार काशिनाथ दाते यांनी केली आहे. अर्थसंकल्पातील मागण्यावरील मुद्द्यावर आमदार काशिनाथ दाते विधानसभेच्या सभागृहात बोलत होते. आ.दाते म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्यात मोठी औद्योगिक वसाहत आहे. आणि आता त्याचा विस्तार सहाशे एकरामध्ये होत आहे. भविष्यात औद्योगिक वसाहतीचा विस्तार होत असतांना पारनेर मतदार संघाचा विचार केला गेला पाहिजे. पारनेर तालुका अतिशय दुष्काळी मतदार संघ आहे. कुठल्याही प्रकारची पाण्याची सोय नाही. पाउस पडला तरच पिके घेता येतात. अशी परिस्थिती आहे. त्यामुळे तालुक्यातील नगर- कल्याण रस्त्यावरील टाकळी ढोकेश्वर, भावळणी येथे नव्याने एमआयडीसी दिल्यास युवकांना हक्काचा रोजगार मिळेल, अशी मागणी आमदार काशिनाथ दाते यांनी केली आहे.

पारनेर मतदार संघात ३०० लोकसंखेच्या अनेक छोट्या वाड्या वस्त्या आहे. मुख्यमंत्री किंवा प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत या वाड्या वस्त्या मुख्य रस्त्याला जोडण्याची गरज आहे. दरवष १०० किलोमीटरचा कोठा देण्यात यावा. तसेच ग्रामीण रस्त्याची, जिल्हा मार्गची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. त्यामुळे त्या रस्त्यासाठी निधी मिळण्याची गरज असल्याचे आ.दाते म्हणाले.

## बी विभाग इमारत सूंदर परंतु मूलभूत सुविधा पासून वंचित

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२१, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका देशातील अतीशय सूंदर अशी पालिका म्हणून ओळखले जाते. नेरुळ येथे बी विभागाची अतिशय सूंदर अशी इमारत उभी राहिली आहे. जनतेची कामे जलदगतीने होण्यासाठी उपयुक्त अशी इमारत आहे. एखाद्याला महत्वाची झेरॉक्स करायची असेल तर खूपच दूर जावे लागते.सगळ्यात आश्चर्यजनक बाब म्हणजे इमारतीमध्ये महिला सिक्युरिटी यांना आपली वर्दी बदलण्यासाठी रूम नाही. त्यांची गैरसोय बघून संताप आला. वरिष्ठ अधिकारी यांचे ड्रायव्हर कार्यालय बाहेर उन्हात बसून असतात. एखादी महिला कार्यलयात महत्वाच्या कामासाठी आपल्या लहान बाळाला घेऊन आली तर बाळाला दूध पाजण्यासाठी हिरकणी कक्ष देखील नाही. याबाबत बी वॉर्ड अधिकारी जयंत जावडेकर यांना सम्पर्क साधला असता, कोणतेही ठोस उत्तर दिले नाही. याबाबत आयुक्तांनी लवकरात लवकर बी वॉर्ड मध्ये हिरकणी कक्ष तसेच महिला सुरक्षा रक्षक यांच्यासाठी चेंजिग रूम आणि ड्रायव्हरसाठी बैठक रूम व्यवस्था करावी. अन्यथा शिवसेना आपल्या पद्धतीने उग्र आंदोलन करेल. अशी माहिती समाजसेवक शिवसेना उपशहर प्रमुख सिध्दार्थ साळवी यांनी दिली आहे.

## राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये परिक्रमा तंत्रनिकेतनच्या खेळाडूंचे घवघवीत यश




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, पुणे :** इंटर इंजीनिअरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये समर्थ पॉलीटेक्निक, जुन्नर (पुणे) येथे संपन्न झालेल्या ॲथलेटिक्स या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये परिक्रमा पॉलिटेक्निक चे खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत असे यश संपादन केले. मुलींमध्ये कु.वैष्णवी शेंडगे हिने २०० मीटर मध्ये प्रथम क्रमांक तर १०० मीटर मध्ये द्वितीय क्रमांक मिळविला व मुलांमध्ये कु.संकेत कोकाटे १०० मी. द्वितीय क्रमांक मिळविला. व अतिशय चुरशीच्या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत खेळाडूंनी आपले व महाविद्यालयाचे नाव राज्यामध्ये झळकावले. या खेळाडूंचे परिक्रमा शैक्षणिक संकुलाचे संस्थापक, माजी नामदार बबनराव पाचपुते, अध्यक्षा डॉ.प्रतिभा पाचपुते, सचिव आमदार विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. प्रतापसिंह पाचपुते, ॲकॅडमी डायरेक्टर इंद्रायणी पाचपुते, मुख्य अति. कार्यकारी अधिकारी प्रा.अनिल पुंड, अती.ॲकॅडमी डायरेक्टर संजिवजी कदम पाटील, तंत्रनिकेतन प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी, इंजीनिअरिंग प्राचार्य मोहन धगाटे, एम.बी.ए. डायरेक्टर डॉ. सुदर्शन गिरमकर, बी.फार्मसी प्राचार्य डॉ.सुनील निर्मळ डी.फार्मसी प्राचार्य रमेश शिंदे, सायन्स कॉलेज प्राचार्य डॉक्टर पांडुरंग इथापे यांनी अभिनंदन केले. व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या खेळाडूंना परिक्रमा तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ.प्रशांत सूर्यवंशी व शारीरिक शिक्षण संचालक प्रा.अशोक राहिंज यांचे मार्गदर्शन लाभले.

## लग्नाच्या २ दिवस आधी तरुणाचा अपघाती मृत्यू

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, हिंगोली :** लग्नाला अवघे दोन दिवस शिल्लक असताना नवरदेवाचा अपघाती मृत्यू झाला आहे. हिंगोलीच्या सेनगाव तालुक्यातील कापडशिंगी येथे ही घटना घडली आहे. गणेश तनपुरे असं मृत तरुणांचं नाव आहे. युवकाच्या लग्नाचं आज देवकार्य होतं. देवकार्यासाठी वाघजाळी येथे असलेल्या आई आजी हिला आणण्यासाठी हा तरुण सकाळीच घरून निघाला होता. गणेश तनपुरे हा तरुण आजीच्या गावाजवळ हाकेच्या अंतरावर असलेल्या आजेगाव येथे पोहोचला. मात्र आजी आणि नातवाची भेट होणे हे नियतीला मान्य नव्हते. गणेश दुचाकीवरून जात असताना अज्ञात वाहनाने त्याच्या दुचाकीला धडक दिली. यात गणेश तनपुरे याचा जागीच मृत्यू झाला. अज्ञात टिप्पर चालकाने या तरुणास जवळपास १०० मीटर पर्यंत फरफटत नेले, अशी माहिती गावातील नागरिकांनी दिली. लग्न कार्यामुळे घरात आनंदाचं आणि उत्साहाचं वातावरण होते. लग्नाआधी केलं जाणारं देवकार्य आज होत असल्याने घरात तयारी सुरु होती. मात्र काही क्षणामध्ये होत्याचं नव्हतं झालं. या अपघाताची माहिती मिळतात गोरेगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विठ्ठल रुक्मिणीमातेच्या पूजेची २५ मार्च पासून ऑनलाईन नोंदणी - कार्यकारी अधिकारी शेळके

### घरबसल्या करता येणार पुजेची नोंदणी: चंदनउटी पूजेचा देखील समावेश



**श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेच्या नित्यपूजेसाठी अनुक्रमे रु.२५ हजार, रू.११ हजार तसेच पाद्य पूजेसाठी रू.५ हजार व तुळशी, अर्चन पूजेसाठी रू.२१००/- तसेच श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेच्या चंदनउटी पूजेसाठी अनुक्रमे रु.२१ हजार, रू.९ हजार इतके देणगी मुल्य आहे.**


**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२१, पंढरपूर :** श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नित्यपुजा, पाद्यपूजा, तुळशी अर्चन पूजा, चंदन उटी पूजा इत्यादी सर्व प्रकारच्या पूजा श्री.विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. दिनांक ०१ एप्रिल ते ३१ जुलै २०२५ या कालावधीतील पूजांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याची सुरवात दिनांक २५ मार्च रोजी स.११ पासून होत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.याबाबत मंदिर समितीच्या दि.०३ मार्च रोजीच्या सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. भाविकांना पूजेची नोंदणी https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे.

यापूर्वी पहिल्या टप्प्यात दि.०७ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२४ व दुसऱ्या टप्प्यात दि.०१ जानेवारी ते ३१ मार्च २०२५ या कालावधीतील श्रींच्या नित्यपूजा, तुळशी अर्चन पूजा व पाद्यपूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून व देशभरातून कर्नाटक, आसाम, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यातील भाविकांनी पूजेची नोंदणी केली होती. यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आता तिसऱ्या टप्प्यात दि. ०१ एप्रिल ते ३१ जुलै, २०२५ या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, तुळशी अर्चन पूजा, पाद्यपूजा व चंदन उटी पूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ऑनलाइन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयातून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येईल.

याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६ -२९९२९९ या दूरध्वनी क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा.ग्रीष्म ऋतूतील वाढत्या उन्हापासून श्री विठुरायाला शीतलता मिळावी. यासाठी दरवर्षी चैत्र पाडव्यापासून मृग नक्षत्राने पावसाळ्याची सुरुवात होईपर्यंत दररोज दुपारी चंदनउटी पूजेची परंपरा आहे. त्यानुसार यंदाच्या या पूजेला गुढीपाडव्यापासून पासून सुरुवात होत आहे. या चंदनउटी पूजेची नोंदणी देखील ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे, असे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

## कुंडलवाडी शहरात राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धेचे भव्य आयोजन



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२१, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथील श्री कुंडलेश्वर मॉर्निंग वॉक ग्रुप व कुंडलवाडी शहरवासीयांच्या वतीने रविवार, दि.२३ मार्च २०२५ रोजी राज्यस्तरीय मॅराथॉन स्पर्धा कुंडलवाडी येथील कुंडलेश्वर मॉर्निंग वॉक ग्रुप व कुंडलवाडी शहरवासीयांच्या वतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून जास्तीत जास्त युवक, युवती, महिला, पुरुष,प्रौढ, वृध्दांनी सहभागी होऊन स्पर्धा यशस्वी करावी. असे आवाहन समिती अध्यक्ष सुरेश दुगमोड यांनी केले आहे.

सदर स्पर्धा दिनांक २३ मार्च २०२५ रोजी सकाळी ठिक ०५ वाजता आरंभ करण्यापुर्वी स्पर्धाकांनी उपस्थित राहणे आवश्यक असून स्पर्धेचे नियम व अटी स्पर्धकांना सांगितले जातील. स्पर्धेला सुरुवात सकाळी ०६.०० वाजता होणार असून पुरुषासाठी अशी ५ कि.मी. तर महिलांना २ किमी अंतर धावणे बंधनकारक आहे.

सदर स्पर्धा म. बसवेश्वर चौक (चुंगी नाका) शहिद भगतसिंग रोड येथून सुरुवात होणार असून स्पर्धाकांनी स्पर्धेसाठी आवश्यक साहित्य स्वतः आणणे आवश्यक आहे. पुरुषासाठी व महिलांसाठी बक्षिसाचे स्वरुप सारखेच असून राज्यस्तरीय प्रथम स्मृतीचिन्ह पदक व ५००१/- रुपये, द्वितीय - स्मृतीचिन्ह पदक व ३००१/- रुपये, तृतीय स्मृतीचिन्ह पदक व २००१/- रुपये रोख याशिवाय प्रोत्साहनपर विशेष तीन पारितोषके पदक देऊन सन्मान करण्यात येईल. स्पर्धेदरम्यान स्पर्धकांना जीविताची जोखीम स्पर्धाकावर राहील.

स्पर्धेसाठी पंच म्हणून नांदेड जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटना पंच प्रलोभ कुलकर्णी, वैभव दमकोंडावार, ज्ञानेश्वर सोनसेठ, गोविंद पांचाळ, साईनाथ दंतलवाड, केरबा जाधव, ज्ञानेश्वर कोंडलाडे हे उपस्थित राहणार आहेत.

या भव्य मॅराथॉन स्पर्धेसाठी कुंडलवाडी मॉर्निंग वॉक ग्रुप व कुंडलवाडी शहरवासीयांनी विशेष योगदानासह परिश्रम घेत आहेत. स्पर्धे साठी आजतागायत २५० पुरूष व ५० स्त्रीयांनी आपली नावे नोंदवली असल्याचे संयोजन समितीने सांगितले आहे.

मॅरेथॉन स्पर्धेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष यांनी स्पर्धेसाठी वेगवेगळ्या जिल्ह्यातून झालेली नोंदणी तसेच धावणे मार्ग आणि स्पर्धा बक्षिसासंदर्भात माहिती दिली.

## डहाणूमध्ये आदिवासी जातीचा बोगस दाखले बनवणारे रॅकेट

### एका परप्रांतीय व्यक्तीवर गुन्हा दाखल; आदिवासी संघटना आक्रमक




**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२१, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील सरावली सावटा हात येथील रहिवासी असलेल्या आनंद रामाशंकर ठाकूर या परप्रांतीय व्यक्तीने खोट्या कागदपत्रांच्या आधारे आदिवासी वारली जमातीचा खोटा जातीचा दाखला मिळविल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज

फेडरेशनच्या पालघर जिल्हा सचिवांनी तक्रार देऊन पाठपुरावा केल्यानंतर प्रकरणाची चौकशी करण्यात आली. दरम्यान, संयुक्त आदिवासी संरक्षण समिती अंतर्गत पालघर जिल्ह्यातील विविध सामाजिक व राजकीय आदिवासी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांसमोर या प्रकाराला जोरदार विरोध दर्शवून आक्रमक भूमिका घेतली. या पार्श्वभूमीवर तहसीलदार डहाणू यांनी डहाणू पोलीस ठाण्यात पत्र पाठविल्यानंतर आनंद ठाकूर व किरण डोंगरकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशनचे सचिव अरुण धोडी यांनी दिनांक ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी तहसील कार्यालयाकडे पत्राद्वारे तक्रार दाखल केली होती. या पत्राच्या अनुषंगाने तहसील कार्यालयाने चौकशी सुरु केली असता आनंद ठाकूर हे मूळचे हिंदू-राजपूत असून, परप्रांतीय असल्याचे निष्पन्न झाले. त्यांनी शासनाची दिशाभूल करत खोटी कागदपत्रे सादर करून आदिवासी वारली या अनुसूचित जमातीचा दाखला मिळवला आहे.

या प्रकरणी तहसील कार्यालय, डहाणू येथे दिनांक ०६ मार्च २०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली. यावेळी शासकीय आश्रमशाळा बापूगावचे मुख्याध्यापक, सरावलीचे तलाठी, डहाणूचे सेतू चालक तसेच ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशनचे सचिव उपस्थित होते. या सुनावणी दरम्यान आनंद ठाकूर यांनी त्यांचा जन्म २८ ऑक्टोबर १९८८ रोजी उपजिल्हा रुग्णालय, डहाणू येथे झाल्याचे सांगितले. त्यांच्या वडिलांचे नाव रामाशंकर लालजी ठाकूर व आईचे नाव रेखा रामाशंकर ठाकूर असे आहे. त्यांनी १ ली ते ७ वी पर्यंतचे शिक्षण जिल्हा परिषद शाळा आशागड येथे तर पुढील शिक्षण के. के. मेस्त्री हायस्कूल, सरावली येथे घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच आनंद ठाकूर यांनी व त्यांच्या पत्नीने ठाकूर हे आडनाव ठाकरे असे राजपत्राद्वारे बदलल्याचे सांगितले. त्यांच्या पत्नीचे माहेरचे नाव अनिता गणपत सापटा असून त्या आदिवासी वारली जमातीतील असल्याने आपल्या मुलाच्या भविष्यासाठी आनंद ठाकूर यांनी खोटी कागदपत्रे तयार केली. त्यांनी अस्तित्वात नसलेल्या शासकीय आश्रमशाळा, बापूगाव या नावाने शाळा सोडल्याचा बनावट दाखला मिळवून घेतला असून, त्यात जातीचा उल्लेख हिंदू-वारली असा आहे. हा दाखला आशागड येथील किरण डोंगरकर यांच्याकडून मिळविल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरच्या खोट्या दाखल्याच्या आधारे त्यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी, डहाणू यांच्याकडून दिनांक १३ जून २०२४ रोजी हिंदू-वारली जातीचा दाखला मिळविला.

मात्र, चौकशी आणि सुनावणी दरम्यान त्यांनी ही बाब खोटी असल्याचे स्वतः मान्य केले आहे. त्यांनी खोटी वंशावळ तयार करून, बनावट कागदपत्रे सादर करून शासनाची दिशाभूल केल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी डहाणूचे तहसीलदार सुनील कोळी यांनी मंडळ अधिकारी गौरव बांगारा यांच्या मार्फत डहाणू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर आनंद ठाकूर व किरण डोंगरकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शासनाच्या फौजदारी कायद्यानुसार या प्रकरणी पुढील कारवाई सुरू असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# बनाईदेवी यात्रोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात

## यात्रेनिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील आदर्श गाव टाकळीढोकेश्वर पंचक्रोशीतील सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान असलेले जागृत देवस्थान ग्रामदैवत माता बनाई देवी यात्रोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी दिनांक ३१ मार्च ते ३ एप्रिल दरम्यान होणाऱ्या या यात्रोत्सवा निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक अशा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवार, दि.३१ मार्च २०२५ रोजी फकीर शहावाली बाबांचा संदल कार्यक्रम मोठ्या धुमधडाक्यात दारुगोळ्याची आतषबाजी करण्यात येणार आहे. तसेच परंपरेनुसार मंगळवार, दि.०१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता बनाईदेवी काठी मिरवणूक रात्री ७.३० वाजता भव्य छबिना मिरवणूक व जागरण गोंधळ रात्री १० वाजता निलेश कुमार आहिरेकर सह रुपाली पुणेकर लोकनाट्य तमाशा, बुधवार दि.२ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता मळगंगा देवीची काठी मिरवणूक, दुपारी ४ वाजता कुस्त्यांचा जंगी आखाडा भरविण्यात येणार आहे. रात्री ७.३० वाजता भव्य छबिना मिरवणूक रात्री १० वाजता मळगंगा मंदिरासमोर जागरण गोंधळ गुरुवार, दि.०३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता मुक्ताई देवीची काठी मिरवणूक, यात्रेनिमित्त सकाळी ९ ते ६ वाजेपर्यंत भव्य बैलगाडा शर्यतींचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. रात्री ८.३० वाजता छबिना मिरवणूक, रात्री १० वाजता देवीसमोर जागरण गोंधळ यात्रोत्सवात दररोज भव्य मिरवणुकीसाठी मुख्य पारंपारिक पद्धतीने ढोल ताशा सनई पथक खास आकर्षण असणार आहे.

यात्रोत्सव असल्या कारणाने गावातील मुख्य प्रवेशद्वार तसेच संपूर्ण मंदिरांवर विद्युत रोषणाई करण्याचे कामे अंतिम टप्प्यात आले आहेत. या सर्व धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ परिसरातील भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन बनाईदेवी यात्रा कमिटीच्या वतीने तसेच समस्त ग्रामस्थ टाकळी ढोकेश्वर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

**अतिरिक्त पोलिस बंदोबस्त टाकळी ढोकेश्वर येथील बनाईदेवी यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने आयोजित केलेल्या विविध धार्मिक व इतर कार्यक्रमात पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांच्या सूचनेनुसार यात्रोत्सवाकरीता अतिरिक्त पोलिसांचा बंदोबस्त तैनात असणार आहे. यात्रा उत्सव दरम्यान, हुल्लडबाजी करणाऱ्यासह भुरट्या चोरांवर नजर ठेवण्याची सूचना पथकाला करण्यात आली आहे.**

# स्वच्छ पाणी हे जीवन, पण बिघडले तर ते विनाश

पाणी ही निसर्गाची सर्वात मोठी देणगी आहे कारण ती संपूर्ण सजीव जगाचा आधार आहे; त्याशिवाय जीवनाची कल्पना करणे निरर्थक आहे. पाण्याच्या समृद्धीमुळे जंगल, वृक्ष, वनस्पती आणि वन्यजीव समृद्धी वाढते. सर्वांना शुद्ध पाणी आणि शुद्ध हवा मिळते. ऋतूचक्र, हवामान आणि निसर्गात संतुलन असते, अन्नाची गुणवत्ता आणि उत्पादन वाढते, त्याचा निसर्गाच्या प्रत्येक घटकावर थेट परिणाम होतो. जर सर्वांना पुरेसे शुद्ध पाणी मिळाले तर समृद्धी निश्चित आहे, परंतु जर हे पाणी अपुरे आणि प्रदूषित असेल तर हे पाणी विनाशाचे कारण आहे. जगातील सुमारे ९७ टक्के पाणी खारट आहे किंवा पिण्यायोग्य नाही. भारतात जगाची सर्वाधिक १८ टक्के लोकसंख्या आहे, पण त्या तुलनेत, भारताकडे जगातील फक्त ४ टक्के जलसंपत्ती आहे, ज्यामुळे तो पाण्याच्या टंचाई असलेल्या देशांपैकी एक बनतो, त्यामुळे लोकांना याची किंमत आपल्या जीवाने मोजावी लागते, कारण दरवर्षी लाखो भारतीय दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारामुळे मरतात. द लॅन्सेटच्या एका अभ्यासानुसार, २०१९ मध्ये भारतात जल प्रदूषणामुळे ५,००,००० हून अधिक मृत्यू झाले.

दरवर्षी २२ मार्च रोजी जगभरात जागतिक जल दिन पाण्याचे महत्त्व आणि प्रत्यक्ष परिस्थितीबद्दल जागरूकता निर्माण करण्यास साजरा केला जातो. या वर्षी २०२५ ची थीम 'हिमनदी संवर्धन' आहे, जी भविष्यासाठी या गोठलेल्या हिमनद्यांच्या जलस्रोतांचे जतन करण्यावर लक्ष केंद्रित करते. हिमनदी हा पाण्याचा एक मोठा साठा आहे, त्याचे वितळलेले पाणी पिण्यास, शेती, उद्योग, स्वच्छ ऊर्जा उत्पादन आणि निरोगी परिसंस्थेसाठी आवश्यक आहे, परंतु सतत जागतिक तापमानवाढीमुळे मोठे हिमनदी वितळत आहेत आणि ते वितळलेले शुद्ध पाणी समुद्राची पातळी वाढवत आहे. वेगाने वितळणाऱ्या हिमनद्यांमुळे पाण्याच्या प्रवाहात अनिश्चितता निर्माण होत आहे, ज्याचा मानवांवर आणि ग्रहावर खोलवर परिणाम होत आहे. जागतिक स्तरावर कार्बन उत्सर्जन आणि कमी होत चाललेल्या हिमनद्यांना तोंड देण्यासाठी स्थानिक धोरणाची आवश्यकता आहे.

१५ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या वार्षिक जागतिक जोखीम अहवालाच्या २० व्या आवृत्तीत जागतिक आर्थिक मंचाने इशारा दिला आहे की भारताला एक गंभीर आव्हानाचा सामना करावा लागणार आहे कारण पुढील दोन वर्षांत (२०२५-२०२७) पाणीटंचाई हा देशासाठी सर्वात गंभीर धोका म्हणून उदयास येईल. शिकागो विद्यापीठाच्या एनर्जी पॉलिसी इन्स्टिट्यूटने एक अहवाल प्रसिद्ध केला आहे, ज्यामध्ये सर्वात मोठ्या वायु गुणवत्ता निर्देशांकानुसार, प्रदूषित वायु सरासरी आयुर्मान ३.६ वर्षांनी कमी करत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, दरवर्षी ३,५७५,००० लोक पाण्याशी संबंधित आजारांमुळे मृत्युमुखी पडतात. हे दर १० सेकंदाला एका मृत्यूइतके आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने सरकारला २०२४ च्या एका अभ्यासाची माहिती दिली आहे ज्यामध्ये असे आढळून आले आहे की पंजाबमधील प्रदूषित नद्या-नाल्यांजवळ राहणाऱ्या लोकांना कर्करोग होण्याची शक्यता जास्त असते. जल प्रदूषणाची मुख्य घटक म्हणजे औद्योगिक कचरा, सांडपाणी, सूक्ष्मजीव प्रदूषण, निलंबित पदार्थ, रासायनिक प्रदूषण, विरघळणारे प्रदूषक, किरणोत्सर्गी कचरा, औष्णिक प्रदूषण, मानवी कचरा, औद्योगिक उपक्रम, तेल प्रदूषण, कृषी प्रदूषण, जागतिक तापमानवाढ, खाणकाम, घनकचरा, आम्ल पाऊस इत्यादी. ही विशेष घटक पाण्याच्या संपर्कात येताच पाणी विषारी बनवतात.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, २०२१ मध्ये, २ अब्जाहून अधिक लोक पाण्याची कमतरता असलेल्या देशांमध्ये राहत होते. २०२२ मध्ये, जगभरात किमान १.७ अब्ज लोकांनी विष्ठेने दूषित पिण्याच्या पाण्याचे स्रोत वापरले. विष्ठेमुळे पिण्याचे पाणी दूषित होणे हे पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षिततेसाठी सर्वात मोठा धोका आहे. २०२१ मध्ये, २५१.४ दशलक्षाहून अधिक लोकांना शिस्टोसोमियासिससाठी प्रतिबंधात्मक उपचाराची आवश्यकता होती. सूक्ष्म जीव शास्त्रीय दृष्ट्या दूषित पिण्याच्या पाण्यामुळे अतिसार, कॉलरा, आमांश, टायफॉईड आणि पोलिओसारखे आजार होऊ शकतात आणि दरवर्षी अतिसाराशी संबंधित अंदाजे ५,०५,००० मृत्यू होतात असा अंदाज आहे. २९६ दशलक्ष लोक असुरक्षित विहिरी आणि झऱ्यांमधून पाणी घेतात आणि ११५ दशलक्ष लोक तलाव, नद्या आणि ओढ्यांमधून प्रक्रिया न केलेले पृष्ठभागावरील पाणी गोळा करतात.

जलद शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे जलस्रोतांचे प्रदूषण वाढले आहे, ज्यामुळे ते वापरासाठी अयोग्य झाले आहेत. अकार्यक्षम शेती पद्धती, रसायनांचा अतिरेकी वापर, भूजलाचा अतिरेकी वापर, हवामान बदल, खराब पाणी व्यवस्थापन आणि योग्य पायाभूत सुविधांचा अभाव यासारखे अनेक घटक पाणीटंचाईचे संकट वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. जागतिक बँकेच्या काही आकडेवारीनुसार, भारतात १६.३ कोटी भारतीयांना सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध नाही, २१ कोटी भारतीयांना सुधारित स्वच्छता सुविधा उपलब्ध नाहीत. २१ टक्के संसर्गजन्य आजार हे असुरक्षित पाण्याशी संबंधित आहेत, भारतात दररोज पाच वर्षांखालील ५०० मुले अतिसारामुळे मृत्युमुखी पडतात. भारतातील अर्ध्याहून अधिक नद्या अत्यंत प्रदूषित आहेत आणि इतर अनेक आधुनिक मानकांनुसार असुरक्षित पातळीवर आहेत. शहरांमधून वाहणाऱ्या नद्यांनी नाल्यांचे रूप धारण केले आहे. नीति आयोगाच्या २०१८ च्या संमिश्र जल व्यवस्थापन निर्देशांक अहवालात असे म्हटले आहे की दरवर्षी सुमारे दोन लाख लोक सुरक्षित पाण्याच्या अपुऱ्या उपलब्धतेमुळे मृत्युमुखी पडतात. २०३० पर्यंत, सुमारे ६० कोटी लोकांना पाण्याच्या संकटाचा सामना करावा लागू शकतो, जे भारताच्या अंदाजे लोकसंख्येच्या सुमारे ४० टक्के असेल.



वॉटर या स्वयंसेवी संस्थेने म्हटले आहे की, भारतात, १.४ अब्ज लोकसंख्येपैकी, ३५ दशलक्ष लोकांना अजूनही सुरक्षित पाणी उपलब्ध नाही आणि ६७८ दशलक्ष लोकांना सुरक्षित स्वच्छता सुविधा उपलब्ध नाही. दरवर्षी दहा लाखांहून अधिक लोक सुरक्षित पाणी आणि स्वच्छतेच्या अभावामुळे मृत्युमुखी पडतात आणि दर दोन मिनिटांनी एका मुलाचा पाणी किंवा स्वच्छतेशी संबंधित आजारांमुळे मृत्यू होतो. जगातील २९ टक्के शाळांमध्ये स्वच्छ पाणी आणि शौचालये यासारख्या मूलभूत गरजांचा अभाव आहे. पाणी आणि स्वच्छतेच्या अभावामुळे दरवर्षी जागतिक स्तरावर २६० अब्ज डॉलर वाया जातात. जगातील किमान ५० टक्के लोकसंख्या वर्षातील किमान एक महिना पाण्याच्या तीव्र टंचाईत जगते. जगभरातील महिला, मुली पाण्यासाठी दररोज काही किलोमीटर चालतात आणि पाणी गोळा करण्यात २० कोटी तास घालवतात. घरात सुरक्षित पाणी आणि स्वच्छता उपलब्ध असल्याने वेळ वाचतो, यामुळे कुटुंबांना शिक्षण आणि कामाच्या संधी मिळविण्यासाठी अधिक वेळ मिळतो, ज्यामुळे त्यांना गरिबीचे चक्र तोडण्यास मदत होते.

जोपर्यंत एखाद्या गोष्टीची कमतरता नसते तोपर्यंत माणसाला त्या गोष्टीचे मूल्य कळत नाही, जीवन पाण्यावर अवलंबून असते, बहुतेक लोकांना पाणी मिळविण्यासाठी जास्त कष्ट करावे लागत नाहीत, त्यांच्या मते जगात पाणी सहज उपलब्ध आहे, कदाचित म्हणूनच लोकांना पाण्याचे मूल्य समजत नाही. कठीण परिस्थितीत पाणी उपलब्ध नसेल तर शरीर आणि मन अस्वस्थ होते. उन्हाळ्यात, जर काही कारणास्तव शहरांमधील लोकांना एक दिवसही पाणी मिळाले नाही, तर गोंधळ उडतो. मग तेव्हा पाणी ही जगातील सर्वात मौल्यवान गोष्ट वाटते. आज आपल्याला सहज उपलब्ध होणारे पाणी, कोट्यवधी लोक त्या पाण्यासाठी दररोज भटकतात, ते पाणी गोळा करण्यात आपला मौल्यवान वेळ वाया घालवतात, तरीही त्यांना पुरेशा प्रमाणात शुद्ध पाणी मिळत नाही, नाईलाजाने अशुद्ध पाणी पिण्यामुळे ते प्राणघातक आजारांना बळी पडतात आणि अकाली जीव गमावतात. पाण्याअभावी प्राणी, पक्षी आणि वन्यजीवांची स्थिती अधिकच बिकट होते. पाण्याचा अपव्यय आणि योग्य व्यवस्थापनाद्वारे त्याची साठवणूक कशी होते हे आपल्या सर्वांना माहिती आहे पण त्याचे गांभीर्य आपल्याला समजत नाही. मौल्यवान पाण्याचे महत्त्व समजून घ्या. प्रत्येक व्यक्ती आणि जीवांचा शुद्ध पाण्यावर समान हक्क आहे. सर्वांना शुद्ध पाणी मिळावे ही आपली जबाबदारी आहे. पाणी वाचवा, मौल्यवान जीव वाचवा.

**डॉ. प्रीतम भी. गेडाम**
**मोबा.०८२३७४ १७०४१**

# खळबळजनक! पूर्ववैमनस्य व विकृत मानसिकतेतून १४ वर्षीय मुलाची हत्या

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, अकोला :** वाशीम जिल्ह्यात पूर्ववैमनस्य व विकृत मानसिकतेतून १४ वर्षीय मुलाची आरोपींनी निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना पोलीस तपासात उघड झाली आहे. गुन्हा लपवण्यासाठी आरोपींनी मुलाचे अपहरण झाल्याचा बनाव रचला होता.गेल्या सात दिवसांपासून अपहृत मुलाचा शोध घेतला जात असतांना शुक्रवारी त्याचा मृतदेह आढळून आला. त्यानंतर या प्रकरणाचा उलगडा झाला. १४ वर्षीय मुलाच्या हत्या प्रकरणामुळे वाशीम जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

वाशीम जिल्ह्यातील बाभुळगांव येथील संतोष सादुडे यांनी अनसिंग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांचा मुलगा अनिकेत संतोष सादुडे (१४) हा गावातील लग्नाच्या मिरवणुकीत नाचायला गेला होता. रात्रीचे दोन वाजल्यानंतरही तो घरी परतला नाही. गावात शोध घेतल्यावरही तो दिसून आला नाही. त्याचवेळी संतोष सादुडे यांना घराजवळ एक पाच पानाचे पत्र मिळाले. त्यामध्ये अनिकेतचे अपहरण केले असून ६० लाखाची मागणी केली. मागणी पूर्ण न केल्यास अनिकेतला जीवे मारण्याची धमकी दिली होती. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली. १८ अधिकारी व अंमलदार यांच्या तपास पथकाने सर्व दिशांनी तपास केला. तपासदरम्यान प्रणय पद्मणे, शुभम इंगळे यांचेवर पह ल्या दिवसापासूनच पोलिसांना संशय असल्याने त्यांच्यावर लक्ष ठेऊन सखोल चौकशी केली. वारंवार केलेल्या चौकशीत त्यांचा जबाब, हालचाली, कृतीमध्ये विसंगती आढळून आली.

# थोडक्यात

## वनांचे मानवी जीवनातील महत्त्व विषयावर वनीकरण विभागाकडून जनजागृती मोहीम



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२१, मुदखेड (नांदेड) :** तालुक्यातील बारड येथे जागतिक वन दिनानिमित्त मानवी जीवनातील वनांचे महत्त्व जनजागृती साठी सामाजिक वनीकरण विभागांचे विभागीय अधिकारी संदीप चव्हाण, सहाय्यक वनरक्षक शुभांगी लोणकर, वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वनांचे संरक्षण मानवी जीवनातील वनाचे महत्त्व ही संकल्पना रुजवण्यासाठी बारड, निवघा जिल्हा परिषद शाळांमध्ये निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना वनाचे मानवी जीवनातील महत्त्व या विषयावर निबंध सादरीकरण करायचा होता. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होवून या विषयावर निबंध सादरीकरण केला. त्यामध्ये उत्कृष्ट निबंध सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाचे पारितोषिक सन्मानपत्र वनीकरण विभागाकडून यावेळी देण्यात आले आहे.

वनाचे महत्त्व व संरक्षण होण्यासाठी विद्यार्थ्यांना जनजागृतीसाठी सामाजिक वनीकरण विभागाकडून मोहीम हाती घेण्यात आली असून तालुक्यातील शाळेमध्ये मानवी जीवनातील वनांचे महत्त्व या विषयावर निबंध स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांमध्ये वनांबद्दल आदर व संवर्धन संरक्षण जनजागृतीसाठी उत्कृष्टरित्या प्रयत्न केला आहे. यावेळी निबंध स्पर्धेत क्रमांक जि.प.हा. शाळेतील प्रथम मयुरी कंधारे, द्वितीय अनुष्का बेतनाळे, तृतीय गौरी बिच्वेवार तसेच उत्तेजनार्थ सिद्धी पवार या विद्यार्थ्यांनी क्रमांक पटकावून सन्मानपत्र पारितोषिक मिळविले तर निवघा येथील यशवंतराव चव्हाण विद्यालयातील प्रथम कु.श्रुती कमलाकर सूर्यतळे, द्वितीय कु.राशी सूर्यकांत भाकरे, तृतीय कु.द्रोपदा श्रावण एडके, उत्तेजनार्थ कु.शेजल गणपत पांचाळ या विद्यार्थिनीने क्रमांक मिळवून पारितोषिक सन्मानपत्र मिळवले आहे. यावेळी जनजागृती कार्यक्रम यशस्वीतेसाठी वनीकरण विभागाचे संदीप चव्हाण, शुभांगी लोणकर, श्रीकांत जाधव, वनपाल पांडुरंग धोंडगे, धम्मपाल सोनसळे, जयवर्धन वाघमारे, रंगराव राठोड, आदींनी परिश्रम घेतले.

## बुद्धगया येथील महाबोधी बुद्धविहार बौद्ध समाजाच्या ताब्यात द्या रिपाइंचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२१, धाराशिव :** बिहार राज्यातील बुद्धगया येथील महाबोधी बुध्दविहार कायदा १९४९ रद्द करून महाबोधी बौद्ध विहार बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्यात यावे. अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने करण्यात आली आहे. रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष ना.रामदास आठवले यांच्या आदेशानुसार धाराशिवचे जिल्हा नेते रवि माळाळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात बिहार राज्यातील बुद्धगया येथील महाबोधी बुध्दविहार कायदा १९४९ रद्द करून महाबोधी बौद्ध विहार हे बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. यावेळी धाराशिव जिल्हा नेते रवि माळाळे, मराठवाडा उपाध्यक्ष पोपट लांडगे, युवक तालुकाध्यक्ष उमेश माने, दिलीप कांबळे, सोनू माळाळे, आकाश राठोड, गिरीश माळाळे, रोहन वाघमारे, बंटी रोकडे, असिफ पठाण, कुणाल वाघमारे, अझर पठाण, मोहसीन तांबोळी, जग्गू दादा सोनवणे, सागर माळाळे तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## गोदावरी नदी पात्रात दोन मुले बुडाली

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, छ.संभाजीनगर :** पैठण येथील गोदावरी नदी पात्रात एका वारकरी शिक्षण संस्थेतील दोन मुले बुडाली. यातील एका मुलाचा मृतदेह हाती लागला असून, दुसऱ्याचा शोध सुरू होता. ही घटना गुरुवारी सायंकाळी समोर आली. रांगारहाटी येथील शिक्षण संस्थेतील चार विद्यार्थी दुपारच्या सुमारास खेळता खेळता गोदावरी नदीच्या पात्रात उतरले होते.

वाळूसाठी खोदलेल्या खड्ड्यांचा अंदाज न आल्याने यातील चैतन्य अंकुश बदर (वय १३, रा. वालसा खालसा ता. भोकरदन) व भोलेनाथ कैलास पवळे (वय १०, रा. चितेगाव ता. पैठण) हे दोघे बुडाले. पैकी चैतन्य बदर याचा मृतदेह गोदापात्रात आढळून आला असून भोलेनाथ पवळे याचा शोध सुरू होता, असे छत्रपती संभाजीनगर येथील अग्निशमन विभागाचे अधिकारी अशोक खांडेकर यांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच पैठणचे उपविभागीय अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे, पोलीस निरक्षक संजय देशमुख, पोलीस उपनिरीक्षक दशरथ बुरुकुल यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलीस पथक व अग्निशामक दलाच्या १२ जवानाच्या मदतीने शोध कार्य करण्यात आले.

## पिंपळगावात आगीमुळे १५ पेक्षा अधिक दुकाने भस्मसात




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, नाशिक :** निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत येथे भंगार दुकानाच्या गोदामाला शुक्रवारी दुपारी आग लागल्याने १५ ते २० दुकाने भस्मसात झाले. आग विझवण्यासाठी दोन तासांहून अधिक वेळ लागला. पिंपळगाव बसवंत येथे बाबा मंगल कार्यालयासमोर भंगाराची दुकाने आणि गोदामे आहेत. शुक्रवारी एका दुकानातील गॅस सिलेंडरचा स्फोट झाला. त्यातच शॉर्टसर्किटही झाले. त्यामुळे भंगार गोदामातील कागद, प्लास्टिक, लाकुड, रबर यासह वेगवेगळ्या सामानाने पेट घेतला. दुकानाच्या रांगेत कांद्याचे गोदाम असल्याने त्यानेनेही पेट घेतला. आग इतर दुकानांपर्यंतही पोहचली. आगीची तीव्रता पाहता पिंपळगाव बसवंत, ओझर, दिंडोरी, निफाड या ठिकाणाहून अग्निशमन बंब दाखल झाले. तीन तासांहून अधिक वेळ अग्नीतांडव सुरू होते.